# प्रकरण सातवे

# **उपसंहार**

## प्रकरण 7

# उपसंहार

**प्रस्तावना :**

प्रस्तुत अभ्यासाच्या या अंतीम प्रकरणामध्ये या अगोदरच्या प्रकरणांतील सैंध्दातिक व विश्लेषणात्मक विचारधारा एकत्र आणून त्यांच्या आधारे या अभ्यासाचे निष्कर्ष सादर करण्यात येत आहेत. तसेच अशा प्रकारची सार्वजनिक हितावह अभियाने – प्रकल्प अधिक परिणामकारकरीत्या राबवण्यासाठी काही सुचना ही करण्यात येत आहेत.

जलस्वराज्य प्रकल्पाचा मुख्य हेतु 'शुध्द पाणी – स्वच्छ गांव' असला तरी लोकसहभागातून हा प्रकल्प राबवला गेल्याने पाणी पुरवठया बरोबरचं ग्रामीण स्वच्छता, हागणदारी मुक्त गांव, महिला सबलीकरण, भूजलसाठा व्यवस्थापन आणि गावातील शाश्वत पाणी साठा हे प्रयोग रागवण्यात येत आहेत. वरील गोष्टीवर झालेले परिणाम वा ग्रामस्थांना झालेल फायदे जाणून घेण्यास प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे संकलन करण्यात आले आहे. या माहिती संकलनातून अतिग्रे आणि निमशिरगांव गावाचा अभ्यास करून दोन्ही गावातील तुलनात्मकरीत्या अभ्यासही करण्यात आला आहे. यामधून पुढील निष्कर्ष समोर आलेले आहेत.

**पाण्याच्याबाबतीत निष्कर्ष :?**

अतिग्रे आणि निमशिरगांव या गावांमध्ये नळ पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेकडून प्रत्येक घरासमोर नळ बसवण्यात आलेले असून या नळास दैनंदिनरीत्या ठारविक वेळेस पाणी पुरवठा करण्यात येत आहे. असे पाणी कमी – अधिक प्रमाणात दोन्ही गावांत शुध्द असते. तसेच त्याची शुध्दता ही शासन आणि ग्रामस्तरांवर तपासली जाते. यामध्ये पाण्यातील क्षारांचे प्रमाण, त्यांची शुध्दता इ. घटक तपासले जातात. पाण्याच्या टंचाई काळात दैनंदिन पाणी पुरवठयाचे प्रमाण कमी वा दोन दिवसातून एकदा सोडले जात असल्याने अतिग्रे आणि निमशिरगांव ही दोन्ही गावे टॅकरमुक्त घोषीत करण्यात

आलेली आहेत. तसेच वरील दोन्ही गावांत विविध माध्यमांच्याव्दारे पावसाच्या पाण्याचा साठा करण्यात येत आहे.

**स्वच्छतेबाबत निष्कर्ष :**

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये स्वच्छ पाण्याबरोबर स्वच्छतेसही महत्व देण्यात आले आहे. या स्वच्छतेमध्ये सांडपाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन याबरोबर ग्रामस्वच्छता यांचा समावेश करण्यात आलेला आहे. अतिग्रे आणि निमशिरगांव या दोन्ही गावांमध्ये गटारी बांधण्यात आलेल्या आहेत. या गटारी सिमेंट पध्दतीच्या आहेत. या गटारींची कमी – अधिक प्रमाणात दैनंदिन स्वच्छता दोन्ही गावांत केली जाते. तसेच गावातील शोषखड्डयामध्ये गटारीतील पाणी सोडण्यात येते.

अतिग्रे आणि निमशिरगांव या गावांत जवळ जवळ 100 टक्के शौचालय बांधण्यात आलेले आहेत. या शौचालयांपैकी 50 टक्के शौचालये ही जलस्वराज्य प्रकल्प सुरू झाल्यानंतर बांधण्यात आलेले आहेत. ज्या कुंटूबांकडे शौचालय बांधण्यास आर्थिक पैसा नाही अशा कुंटूबांना आर्थिक मदत देऊन दोन वा तीन कुंटूबांच्यामध्ये सामायीक पध्दतीने शौचालय बांधून देण्यात आलेले आहेत. या शौचालयांची स्वच्छता प्रत्येक कुंटूब दैनंदिनरीत्या करीत असताना दिसून येते.

**ग्रामस्वच्छताबाबत निष्कर्ष :**

सांडपाणी व हागणदारीमुक्त गावाबरोबरच ग्रामस्वच्छताही केलेली दिसून येते. अतिग्रे गावामध्ये संपूर्ण ग्रामस्वच्छता करण्यात लोकांचा सहभाग हा कमी प्रमाणात असलेला दिसून येतो तर निमशिरगांव गावामध्ये हाच सहभाग जास्त असल्याचा दिसून येतो. अतिग्रे गावामध्ये दर आठवडयास ग्रामस्वच्छता केली जात नसून ती ठराविक वेळेस करण्याचे प्रमाण जाास्त असल्याचे दिसते तर निमशिरगांव या गावामध्ये अशी स्वच्छता प्रत्येक आठवडयास केली जाते. या स्वच्छतेस गावातील तरूण मंडळे, भजनी मंडळे, सहाय्यकारी संस्था यांचे सहाय्य घेतले जाते.

**महिला सक्षमीकरणबाबत निष्कर्ष :**

ग्रामीण विकासामध्ये ' महिला ' हा घटक केंद्र मानून त्यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासासाठी प्रयत्न करून त्यांना महिला आर्थिक बचत गटाच्या माध्यमातून सक्षम करणे हेही जलस्वराज्य प्रकलपाचे उध्देश आहे. तेंव्हा अतिग्रे आणि निमशिरगांव या गावांत महिला आर्थिक बचत गटांची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यानुसार दोन्ही गावातील जवळ जवळ 100 टक्के महिला या आर्थिक बचत गटाच्या सदस्य बनलेल्या आहेत. या बचत गटातील महिलांना आर्थिक सहाय्य देण्यात आलेले आहे. हे सहाय्य बॅंकेच्या मदतीने कर्ज स्वरूपात देण्यात आलेले आहे. या मिळालेल्या सहाय्याच्या माध्यामातून विविध जोड व्यवसाय केले जात आहेत. हा जोड व्यवसाय केल्याने महिलांना रोजगार उपलब्ध झाले आहेत. त्यामुळे त्यांना कुंटूबांचा दैनंदिन चरितार्थ चालवण्यास मदत झालेली दिसून येते.

**ग्रामसभेबाबत निष्कर्ष :**

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये गावपातळीवर निर्णय घेणारी ग्रामसभा ही सर्वोच्च यंत्रणा असते. या यंत्रणेच्या कामकाजावरच जलस्वराज्य प्रकल्पाचे यश अवलंबून असते. अतिग्रे आणि निमशिरगांव या गावांमध्ये प्रत्येक महिन्यास महिला ग्रामसभा आणि गावाची ग्रामसभा घेण्यात येते. परंतु अशी ग्रामसभा जरी प्रत्येक महिन्यास घेण्यात येत असली तरी या ग्रामसभांना ग्रामस्थांची उपस्थिती दोन्ही गावांत कमी – अधिक प्रमाणात असलेली दिसून येते. या ग्रामसभांमध्ये ग्रामस्थांच्या विकासाबरोबरच गावाचा विकास तसेच महिलांचे व्यक्तिमत्व विकासावर चर्चाही करण्यात येते.

महिला ग्रामसभा व गावची ग्रामसभा या ग्रामसभांमध्ये होणाऱ्या चर्चेमध्ये ग्रामस्थांकडून जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेण्यात येतो. तसेच रेंगाळलेल्या कामाबाबत प्रश्न – शंका विचारण्यात येतात. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये असणारे पदाधिकारी, अध्यक्ष तसेच शासकीय नोकरवर्ग म्हणजे तलाठी – ग्रामसेवक यांच्या

कार्यावर या सभेमार्फत नियंत्रण ठेवण्यात येते. महिला ग्रामसभा व गावाची ग्रामसभा या सभांमध्ये पुरूषांपेक्षा महिलांची उपस्थिती दोन्ही गावांत जास्त आहे.

**ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यातील संबंधाबाबत निष्कर्ष :**

ग्रामस्थांच्या लोकसहभागातून हा जलस्वराज्य प्रकल्प ग्रामस्थांकडून राबवण्याचा आहे. त्याकरीता गावातील ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यामध्ये सहकार्याचे – सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे हे मुख्य काम ग्रामपंचायंत सदस्यांचे असते. या सदस्यांमार्फतच प्रकल्पाचे फायदे ग्रामस्थांपर्यंत पोहचवण्यात येतात. तेंव्हा अतिग्रे आणि तिनमशिरगांव या गावामध्ये या दोहोत मोठया प्रमाणात फरक आहे. हा फरक जाणवण्याचे मुख्य कारण म्हणजे जलस्वराज्य प्रकल्प राबवत असताना गटबाजीचे केले जाणारे राजकारण होय. या गटबाजीतूनच जलस्वराज्य प्रकल्पाचे फायदे लोकांपर्यंत पोहोचवले जातात. म्हणजे जो राजकीय गट सत्तेवर आहे. अशाच गटांच्या लोकांना / ग्रामस्थांना जलस्वराज्य प्रकल्पाचे फायदे मोठया प्रमाणात दिले जातात. तर दुसऱ्या गटातील लोकांना दुर्लक्षित केले जाते.

या राजकीय गटबाजीमुळे जलस्वराज्य प्रकल्प राबवताना ग्रामपंचायत सदस्य आणि जलस्वराज्य प्रकल्प अधिकारी यांच्यात राजकीय वाद होतो. हा वाद विरोधी गट फक्त विरोधास विरोध म्हणून केला जातो. परंतु याचे जलस्वराज्य प्रकल्पावर बाधा येत नाही वा विघातक असे परिणाम प्रकल्पावर झालेले दिसून येत नाहीत.

**लोकवर्गणीबाबत निष्कर्ष** :

लोकसहभागावर आधारीत असणाऱ्या कार्यक्रमांतून ग्रामस्थांमध्ये स्वमालकीची जाणीव होण्यास ' लोकवर्गणी ' ची संकल्पना आली. यास लोकवाटा असेही म्हणतात. या लोकवर्गणीमध्ये ग्रामस्थ फक्त 10 टक्के लोकवर्गणी भरतात. त्यानुसार गावाच्या प्रकल्पाचा आर्थिक आराखडा तयार केला जातो. या आराखडयाच्या 10 टक्के रक्कम लोकवर्गणी स्वरूपांत गोळा केली जाते.यानुसार अतिग्रे गावामध्ये गावातील आर्थिक कुंटूंबांचा विचार

करता सधन कुटूंबांकडून ती अधिक घेण्यात आली. तर ज्या कुटूंबांची आर्थिक स्थिती कमी आहे त्यांकडून कमी घेण्यात आली. याउलट निमशिरगांवमध्ये लोकवर्गणीच्या स्वरूपात प्रत्येक व्यक्तिमागे ठराविक रक्कम देण्याची सक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे तेथे लोकवर्गणी ही कमी जमा झालेली दिसून येते.

**लोकसहभागाबाबत निष्कर्ष :**

शासनाच्या लोकसहभागावर आधारीत धोरणानुसार गावातील ग्रामस्थांचा सहभाग हा महत्वाचा मानण्यात आला. त्यानुसार जलस्वराज्य प्रकल्पामध्ये शासनाचा सहभाग फक्त तांत्रिक सहाय्य पुरवणे, निधी देणे इ. पुरताच मर्यादित आहे. तेंव्हा जलस्वराज्य प्रकल्पामध्ये लोकसहभागास अनन्य असे महत्व असलेले दिसते. यानुसार अतिग्रे गावामध्ये लोकांच्या सहभागाबाबत विचार करता त्यांच्यामध्ये उदानिता दिसून येते. याची विविध कारणे दिसून येतात. तर निमशिरगांव या गावामध्ये लोकांच्या – ग्रामस्थाच्या मनामध्ये जलस्वराज्य प्रकल्प आपलाच असल्याची भावना – जाणिव झालेली दिसून येते. त्यामुळे अतिग्रे गावामध्ये प्रकल्प राबवताना ग्रामस्थांचा सहभाग अल्प असल्याचे तर निमशिरगांवमध्ये याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

**नेतृत्वाबाबत निष्कर्ष :**

जलस्वराज्य प्रकल्प लोकसहभागातून राबवण्यात येत आहे. तेंव्हा संपूर्ण गावातील ग्रामस्थांचे सहकार्य लाभण्यासाठी, त्यांना एकत्र आणण्यास एका कुशल नेतृत्वाची आवश्यकता असते. असे खंबीर नेतृत्व जर लाभले तर प्रकल्प कमी वेळेत पूर्ण होत असतो. तेंव्हा नेतृत्वाचा विचार करता असे दिसून येते की, अतिग्रे गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाबाबत योग्य असे नेतृत्व नाही. येथे जलस्वराज्य प्रकल्प पूर्णतः सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक यांच्या मार्गदर्शनाखाली चालत आहे. तेंव्हा येथे राजकीय संबंध येतो. असा संबंध आल्याने प्रकल्प राबवत असताना गटबाजीचे धोरण अवलंबण्यात येते तर याउलट

निमशिरगांव या गावी प्रकल्पाचे नेतृत्व त्रयस्थ व्यक्तीकडे देऊन संपूर्ण गावाच्या वा ग्रामसभेच्या सल्याने वा संमतीने निर्णय घेऊन जलस्वराज्य प्रकल्प राबवण्यात येतो.

थोडयात दोन्ही गावांमध्ये प्रत्येक घरासमोर नळ योजनेव्दारे नळ बसवून पाणी पुरवठा करण्यात येतो. काही प्रमाणात ग्रामस्वच्छता करण्यास येत असली तरी त्यांचे प्रमाण कमी – अधिक दिसते. दोन्ही गावे हागणदारी मुक्त म्हणून घोषीत करण्यात आलेली आहेत. दोन्ही गावांत महिला बचत गट स्थापन करण्यात आलेले आहेत. या गटांच्या माध्यमातून त्यांना अर्थसहाय्य देण्यात येते. त्याचबरोबर ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ यांच्यातील संबंधामध्ये दोन्ही गावांत प्रामुख्याने तफावत दिसून येते.

वरील प्रमाणे निष्कर्ष समोर येत असले तरी त्या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता काही **उपाय योजना** मांडण्यात येत आहेत. त्या खालील प्रमाणे.

1. दैनंदिनरीत्या दरडोई 40 लि. पाणी पुरेल इतके पाणी प्रत्येक नळास पुरवण्यात यावे.
2. पुरवण्यात आलेले पाणी शुध्द् स्वरूपात असावे.
3. पाण्याची शुध्द्ता तपासण्यास गावपातळीवर योग्य ती यंत्रणा राबवण्यात यावी.
4. दुषित पाणी शुध्द् करण्यास जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यात यावे.?
5. नळ योजना पूर्ण झाल्यानंतर ग्रामस्थांना मीटर पध्द्तीने पाणी पुरवठा करून त्यानुसार पाण्यास योग्य कर आकारण्यात यावा.
6. गावाच्या प्रत्येक रस्त्यांच्या कडेला घराच्या भिंतीलगत नैसर्गिक उतारानुसार गटारी बांधण्यात याव्यात.
7. या गटारीतील पाणी शोषखड्डयांमध्ये सोडण्यात यावे अथवा रस्त्यांच्या कडेला शोभिवंत झाडे लावून त्यांना असे पाणी सोडण्यात यावे.
8. सार्वजनिक शौचालयाची स्वच्छता दैनंदिनरीत्या करण्यात यावी.
9. ग्रामस्वच्छता ही आठवडयातून एकदा करण्यात यावी. या कामी गावातील तरूण मंडळे, भजनी मंडळे, संस्था यांची मदत घेण्यात यावी.

10. गावातील प्रत्येक महिलांना ' महिला बचत गटाच्या ' सदस्य करण्यात येऊन त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास विविध कार्यक्रम घेण्यात यावेत.

11. महिलांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे असे. अर्थसहाय्य देताना भेदभाव करण्यात येऊ नये

12. प्रत्येक महिन्यास महिला ग्रामसभा व गावाची ग्रामसभा घेण्यात यावी. या ग्रामसभांमध्ये प्रमुख विषयांवर चर्चा करून प्रकल्पाचे कार्य पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा.

13. ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांतील संबंधामध्ये सहकार्याची – सलोख्याची भावना असावी.

14. प्रकल्प राबवत असताना ग्रामस्थांपर्यंत प्रकल्पाचे फायदे पोहचवण्याचे काम ग्रामपंचायत सदस्यांचे असते. तेव्हा प्रकल्प राबवताना ग्रामस्थांमध्ये राजकीय गटबाजीचा वापर करू नये.

15. " लोकांचा पुढाकार – त्यात शासनाचा सहभाग " या नविन धोरणानुसार जलस्वराज्य प्रकल्प राबवण्यात येत असल्याने लोकसहभागास महत्त्व आहे. तेंव्हा सर्व ग्रामस्थांनी प्रकल्पासाठी आपला सहभाग देण्यात यावा.

16. जलस्वराज्य प्रकल्पाच्या यशस्वीतेस एका कुशल नेतृत्वाची गरज आहे. तेंव्हा दोन्ही गावांत प्रकल्प पूर्ण होण्यास प्रकल्पाच्या नियोजनाची जबाबदारी एका कुशल अशा नेतृत्वाकडे देण्यात यावी.

17. प्रकल्पाची अंमलबजावणी करत असताना, ग्रामपंचायतीमध्ये राजकीय वाद प्रकल्पाबाबत घालू नयेत वा विरोधी गटाकडून प्रकल्पाच्या निर्णयामध्ये विरोधास विरोध म्हणून करू नये.

शासनाने सन 2002 पासून सुरू केलेल्या ' जलस्वराज्य प्रकल्पाचा ' मूळ हेतू पुढीलप्रमाणे होते.

1. शुध्द् पिण्याच्या पाण्याचा पुरवठा
2. महिला सबलीकरण
3. स्वच्छ आरोग्यदायी जीवन

एकंदरीत पाहता हे तीनही हेतू बहुतांशरीत्या पूर्णत्वाकडे वाटचाल करीत असल्याचे दिसून येतात. गावाने एकत्र यावे, एकत्रितपणे विचार करावा, धोरणे आखावीत व अंमलात आणावीत आणि त्यांतून ग्रामविकास साधावा हे तत्वज्ञान प्रत्यक्षात आणण्यास हा प्रकल्प उपयुक्त ठरला आहे. या प्रकल्पातून सामूहिक रचना प्रभाविपणे पुढे येते, लोकसहभागाचे महत्व स्पष्ट होते. निर्णयप्रक्रियेतील गावाचा विशेषतः महिलांचा सहभाग महिला विकासास प्रामुख्याने चालना देतो, समाजातील भेदभाव दूर करून एकसंध समाज असतो याची प्रचिती येण्यास हा प्रकल्प कारणीभूत आहे हे या प्रकल्पाचे तात्विक आधार सर्वेक्षित गावांत ते प्रत्यक्ष रूप घेताना दिसताता हे या प्रकल्पाचे फलित होय.

तथापी जलस्वराज्य प्रकल्पाचे उध्दिष्ठये साध्य करण्यास शासकिय व स्थानिक पातळींवर अधिक व्यापक प्रयत्नांची आवश्यकता असल्याची दिसून येते.